# - प्रेस नोट -

दि. ३१/०८/२०२६

## वडाळा टी.टी पोलीस ठाणे - खुन

दि.३०/०८/२०२६ रोजी ०१.३० वा.च्या सुमारास फिर्यादी मनोज रामदयाल जैयस्वाल, वय- ४५ वर्षे, धंदा- किराणा दुकान, रा.ठी. शांतीनगर, जय भवानी माता मंदीराजवळ, वडाळा पूर्व, मुंबई यांच्या परिचयाचे सुरेश यादव यांस परिसरात राहावयास असलेले अटक आरोपी क्रमांक ०१ पुरुष वय-२० वर्षे, अटक आरोपी क्रमांक ०२ पुरुष वय-२० वर्षे, व अटक आरोपी क्रमांक ०३ पुरुष वय-१९ वर्षे यांनी जय भवानी माता मंदीराजवळ, शौचालयाजवळ सामाईक इरादयाने जबरदस्तीने पैशाची मागणी केली असता, सुरेश यादव यांनी त्यांना पैसे देण्यास विरोध केला. तेव्हा नमूद तिघांपैकी अटक आरोपी क्र.०२ व आरोपी क्र.०३ यांनी सुरेश यादव यांचे हात पकडून ठेवले व आरोपी क्र.०१ याने त्याच्या हातातील चाकु सुरेश यादव यांच्या पोटात खुपसून, त्यांच्या जवळील मोबाईल फोन काढून घेऊन सुरेश यादव यांस केलेल्या गंभीर दुखापतीमुळे त्यांचा मृत्यु झाला म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.३०/०८/२०२६ रोजी गु.र.क्र. ५७४/२६, कलम १०३(१), ३०९(६), ३(५) बीएनएस २०२३, सह कलम ७ फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम १९३२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------